१० लाख १५ हजार ८९० कोटी रुपयांपर्यंत वाढवली, असं ते चाळीसगावमधल्या सभेत म्हणाले. कोरोना काळातल्या माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वर्तवणुकीवरही त्यांनी टीका केली. राज्यात महायुतीचं सरकार आल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाईल, असं आश्वासन शहा यांनी परभणी इथं झालेल्या प्रचारसभेत दिलं.

**<><><><><>**

भाजपाच्या नेतृत्त्वाखालच्या केंद्र सरकारने केलेली विकासकामं आणि प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वामुळे लवकरच भारत जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज मुंबईत व्यक्त केला. विविध क्षेत्रातल्या व्यावसायिकांची त्यांनी आज भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. सरकारच्या विविध योजनांमुळं देशाची आर्थिक घडी बसायला तसंच नागरिकांचं जीवनमान सुधारण्याला मदत झाली. भारताची आर्थिक प्रगतीही होत असून त्याची दखल आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंही घेतल्याचं नड्डा यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

देशाला आत्मनिर्भर आणि तिसरी जागतिक महासत्ता बनवायचे असेल तर महायुतीला पर्याय नाही, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. चंद्रपूर जिल्ह्यातल्या दुर्गापूर येथे झालेल्या सभेत गडकरी बोलत होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पालघरमध्ये प्रचारसभा घेतली. लाडकी बहिण योजना बंद पडावी म्हणून सावत्र भावांनी खूप प्रयत्न केले. मात्र आम्ही ही

